ब्लॉसम पब्लिक स्कूल

प्रथम सत्र परीक्षा (२०२३ -२४)

इयात्त:- ८ वी                                   विषय: -मराठी

गुण:- ८०

दिनांक: ७ -०९-२०२१                                   वेळ:- ३ .००

तास.

खंड अ- आकलन

प्रश्न १ .खाली दिलेला उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (८)

कराड मधील कृष्णा नदीचा काठावर गोळेश्वर हे छोटेसे गाव पुतळाबाई व दादासाहेब यांचा खाशाबा हा छोटा चिंचोलीत मुलगा अण्णा या टोपणाने ओळखला जाणारा मुलगा पुढे ऑलिम्पिक वीर झाला खाशाबाच्या आजोबा उत्तम कुस्तीपटू होते तर वडिलांनी वडिलांच्या तालमीत खाशाबांच्या कुस्तीचा श्रीगणेशा झाला .आणि त्याचे नाते मातीशी जुळले, प्रतिस्पर्धीला चित कसे करायचे, मान कसे पकडायचे, पट कसा काढायचा, याचे धडे खाशाबांनी वडिलांकडून आत्मसात केले . त्याकाळी गावागावात उरुस भरायचे या उरसात -जत्रेत आखाडे भरतअसे.खाशाबांनी वयाच्या आठव्या वर्षी पहिल्यांदा गावातल्या जाते कुस्ती जिंकली होती .

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी टिळक हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतला. गोळेश्वर गावापासून हायस्कूल पाच किलोमीटर अंतरावर दूर होते. सकाळी शाळेत लवकर पोहोचण्यासाठी खाशाबा चालत न जाता पळत जायचे ,व अंधार पडण्यापूर्वी घरी परतत यावे म्हणून पळत जायचे .पळत पळत जाण्या येण्याच्या सवयीमुळे त्यांना कुस्तीतला दम चांगलाच तयार झाला होता. अनवाणी पायाने पायाने धावल्यामुळे पाय काटक आणि मजबूत झाले. पावसाळ्यात झाडाझुडपात गुडघ्यापर्यंत चिखल तुडवत पावसाची तमा न बाळगता खाशाबा शिक्षण पुर्ण केले व त्याबरोबरच व्यायामाची साधना केली. जगातला सर्वात उत्तम समजल्या जाणाऱ्या ऑलम्पिक क्रीडा स्पर्धेचा पंधरावा महोत्सव फिनलँडची राजधानी राजधानी हेलिसिंकी येथे १९५२ यावर्षी पार पडला.त्यात खाशाबा जाधव यांनी कुस्तीमध्ये खेळ प्रकारात देशाला कांस्यपदक मिळवून दिलं ते भारताचे ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेतले पहिले पदक होय.

प्रश्न १अ. खाली विचारलेल्या प्रश्नांचा उत्तराचा योग्य पर्याय निवडून लिहा . (३)

१)गोळेश्वर गाव काठावर कोणत्या नदीच्या काठावर वसले आहे?

१) भीमा २) कृष्णा

३)कोयना ४)पवना

२) तमा न बाळगणे या शब्दसमुहाचा योग्य अर्थ ओळखा.

१)काळजी करणे २) पर्वा करणे

३स्वत:ची काळजी न घेणे ४) तारतम्य पाळणे

३)कुस्तीपटू या शब्दाचा उताऱ्यात आलेला समानार्थी शब्द शोधा .

१)आॅलिंपिक वीर २)पहिलवान

३) मल्ल ४ क्रीडापटू

ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा .(३)

.खाशाबा निवड खाशाबांनी वडिलांकडून कोणते धडे आत्मसात केले ?

२)ऑलम्पिक क्रीडा स्पर्धेचा १५ वा महोत्सव कोठे व कधी पार पडला

३) खाशाबांनी कोणत्या खेळ प्रकारात कोणते पदक मिळवले?

क) खालील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा.(२)

१)खाशाबा जाधव यांनी माध्यमिक शिक्षणाचा माध्यमिक शिक्षण कसे पूर्ण केले व व्यायामाची साधना कशा प्रकारे केली तुमच्या शब्दात लिहा.

प्रश्न २ खालील कविता वाचा व विचारलेल्या प्रश्नांची प्रश्नांची उत्तरे लिहा (७)

विद्यानेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगामाजी
एक ना दिसे एकही वस्तू विद्यानेही असाध्य आहे
जी देऊनही किंवा भोगुणी उणे न होता सदा वाढतसे,
एकच विद्या-धन अद्भुत गुण न हा दुज्यात वसे.
नानाविध रत्नांची, कणकांची असते भुषणे फार
परि विद्यासम एकही शोभा दायक नसे अलंकार
या साऱ्या भुवनी हितकर विद्येसारखा सखा नाही .
अनुकूल ती जयाला नित्य तयाला उणे नसे काही
गुरुपरि उपदेश करी संकट समई उपायही सुचवी .
चिंतीत फळ देऊनिया कल्पतरू परी मनोरथ पूरवी
या परी सकल सुखे जी देईल , दु:खे समस्त जी वारी
त्या विद्यादेविते अनन्यभावे सदा भजा भारी दिलेल्या प्रश्न २. खाली दिलेल्या प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडून लिहा.

१)मनुष्याच्या जीवनात विद्येमुळे मनुष्याला काय प्राप्त होते ?
१)महत्त्व २)श्रेष्ठत्व ३)कमीपणा ४)उणेपणा
२) उणे या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.
१ ) जास्त २) ऊन ३)कमी ४)फायदा
३) या कवितेत झाडासाठी आलेला समानार्थी शब्द शोधा .
१)उपकारी २)तरु
३)फळ ४)मित्र
४) या कवितेत दागिणे शब्दासाठी आलेला समानार्थी शब्द शोधा.
१)वस्तू २)धन ३)शोभा ४)अलंकार

आ.)खालील प्रश्नांची एक वाक्यात उत्तर लिहा (३)
१)मनुष्याला श्रेष्ठत्व कशामुळे प्राप्त होते?
२) संकट आल्यावर विद्येचा आपल्याला काय उपयोग होतो?

क खालील कवितेच्या ओळीचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा. (२)
१) 'देऊनी किंवा भोगूनी उणे न होता, वाढत असे
एकच विद्याधन अद्भुत गुण हा दुजात वसे '

## खंड -ब : लेखन कौशल्य = १५

प्रश्न २ अ.)खालीलपैकी एका विषयावर १५० शब्दात निबंध लिहा . (८)

१. एका झाडाचे मनोगत - झाडाचे आत्मवृत्त.

मुद्दे :एक बाग शेतकऱ्याचे झाड लावणे ,त्याला खतपाणी घालणे..--बरेच उन्हाळे-पावसाळे खात झाड वाढणे .----रूपांतर होणे वाटसरू -शेतकरी उन्हात सावलीसाठी येणे.फळे देणे ,अनेक पक्षी प्राण्यांचा निवारा होणे --शेवटी माणसाला लाकडाची गरज पडणे ,झाड तोडणे शेवट दु:ख होणे शेवट दु:खद होणे

प्रश्न २ अ)  एका शेतकऱ्याचे मनोगत

मुद्दे : ग्रामीण भागात जन्म,  -----शेती -----वडिलोपार्जित व्यवसाय -----अनेक पिढ्या शेतीत जाणे ----शिक्षणाकडे लहानपणापासून दुर्लक्ष ------शेतात मन लावून काम करणे ------पण शेती निसर्गावर अवलंबून -----सततचा दुष्काळ---- सावकारी कर्ज घेणे ------ शेतमालाला भाव  कमी मिळणे ------- अनेक वाईट विचार -----घरातला खर्च , सामना----शेतकऱ्याचा  अनुदानाच्या  घोषणा--- वरवरची मदत ---कायमस्वरूपी शेतीला पर्यायी,  उपाय सुचवा . सरकारी मदत  .समारोप

प्रश्न २.ब ) पत्रलेखन  : तुमच्या शाळेच्या ग्रंथालयासाठी शालेय संदर्भ पुस्तकांची  मागणी करणारे  ' रसिक  साहित्य भांडार'    ,दादर   - मुंबई ३६ ,यांना विद्यार्थी प्रतिनिधी  या नात्याने मागणी पत्र लिहा.

( ७)

## खंड - क : व्याकरण विभाग

प्रश्न ३अ. खालील वाक्यातील सूचनेनुसार अव्यय ओळखा व त्याचा प्रकार लिहा . ( १२)

१ )आमच्या झाडावर माकड चढले होते

१)क्रियाविशेषण अव्यय    २)शब्दयोगी अव्यय    ३)उभयान्वयी अव्यय    ४)केवलप्रयोगी अव्यय

२)गौरी भरभर जेवत होती

१) शब्दयोगी अव्यय    २) उभयान्वय अव्यय ३)क्रियाविशेषण अव्यय   ४)केवलप्रयोगी

३) अरे देवा ! त्याचे खूप वाईट झाले असे व्हायला नको होते .

१)क्रियाविशेषण अव्यय  २)उभयान्वयी अव्यय ३)शब्दयोगी अव्यय    ४)केवलप्रयोगी

४) तुमच्या वर्ग मित्राला दुखापत झाली तर तुम्ही त्याला मदत करा .

१)शब्दयोगी अव्यय    २)उभयान्वयी अव्यय ३)केवलप्रयोगी    ४)क्रियाविशेषण अव्यय

५)शाब्बास ! तू खूप छान काम केलेस.

१) शब्दयोगी अव्यय   २) क्रिया विशेषण

३)उभयान्वयी अव्यय    ४)केवलप्रयोगी अव्यय

६)तो पास झाला कारण त्याने खूप अभ्यास केला होता १)क्रियाविशेषण अव्यय    २)शब्दयोगी अव्यय

३)उभयान्वयी  अव्यय    ४) केवलप्रयोगी

७) चंद्र  ढगाआड  लपला आहे .

१)केवलप्रयोगी    २) शब्दयोगी अव्यय

३) क्रियाविशेषण अव्यय  ४)उभयान्वयी अव्यय

प्रश्न क्रमांक ८ते  १० अनेक शब्दासाठी एक शब्द दिलेल्या पर्यायातून उत्तराचा योग्य पर्याय ओळखा

८)दर पंधरा दिवसांनी प्रकाशित होणारे—---

१) दैनिक    २) साप्ताहिक

३)पाक्षिक    ४) वृत्तपत्र

९) देवावर कधीही विश्वास न ठेवणारा—-

१) अस्तित    २)नास्तिक

३) श्रद्धाळू    ४)भक्त

१०)नेहमी कमी बोलणारा —---

१)अल्पायुषी  २) मुका  ३) मितभाषी ४)बडबड्या

प्रश्न क्रमांक ११ -१२ खाली दिलेल्या म्हणींच्या अर्थावरून उत्तराचा पर्यायातील योग्य म्हण ओळखा .

११) आपण जेवढी अपेक्षा केली होती त्यापेक्षा आपल्याला जास्त यश मिळणे,जास्त फायदा होणे.
१) एका हाताने टाळी वाजत नाही
२) अंथरून पाहून पाय पसरावे
३)दोघांची भांडणे तिसऱ्याचा लाभ
४) आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन डोळे
१२)एखाद्या व्यक्तीला पात्रता नसताना मोठे पद -प्रतिष्ठा मिळाली तरी त्याला ती आनंद घेता येत नाही .त्याचे महत्व समजत नाही.
१)नाचता येईना अंगण वाकडे
२)शहाणा आला दरवाजा पाडला
३)एक ना धड भाराभर चिंध्या
४) गाढवाला गुळाची चव काय
ब)खालील दिलेल्या शब्दसमूहाचा वाक्यात उपयोग करा व लिहा (४)
१) फरपट होणे
२)वेध लागणे
३)नजरेचे पारणे फिटणे.
४)स्वावलंबी होणे

क)समानार्थी शब्द लिहा. ( ४)
१)विहंगम- २)अभंग -
३)आभाळ - ४)इमाण-
साहित्य = ३०

प्रश्न ४ अ.खालील प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा (८)

१)लेखक नंदु नाटेकर लहानपणी शिक्षण घेतले ते गाव १)कोल्हापूर २)सातारा

३)सांगली ४)खेडेगाव

२)कवीच्या मते कष्टकरी लोक कोणाशी इमान पाळतात ?

१)अथांग २)अभंग

३) माणुसकीचे ४) आपल्या कामाशी

३)घाटात घाट वरंधा घाट या पाठात कोणत्या मराठी संतांच्या ग्रंथाचे वर्णन आले आहे . ?

१)संत तुकाराम २)संत ज्ञानेश्वर

३)संत रामदास४) संत नामदेव

४)शरीराचा कारभार सुरळीत कोणत्या अवयामुळे चालते?

१)कर्णीका २) जिव्हाताई ३) मेंदूराजे ४) पोटोबा

५) लेखक ल. म. कडू यांना मूर्तीला तडे जाऊ नये म्हणून सापडलेला उपाय .

१)गाईचे शेण २)माती

३) घोड्याचे शेण ४) माती -पाणी

६)आम्ही चालू पुढे वारसा या कवितेत कवी कशाचा वसा पुढे चालवायला सांगत आहे?

१)शिक्षणाचा २) गुरु- शिष्याचा ३) गुरुचा ज्ञानरुपी

७) आम्ही चालवु पुढे वारसा या कवितेत कोणाची कीर्ती उंच अंबरात पसरणार आहे ?

१) कवीची २) माणसाची

३) लोकांची ४) गुरुची

८) प्रभात या कवितेत नव्या युगाच्या नभात कशाचे तेज पसरले आहे?

१) कलागुणांचे २)ज्ञानाचे ३)मानवतेचे ४ )कलेचे

प्रश्न ४ ब.)खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.
( ८ )

१. प्रतिभेची प्रभात कोठे होणार आहे ?

२.कष्टकऱ्यांची वस्ती कोठे आहे ?

३.लेखक नंदु नाटेकर यांना कोणता पुरस्कार मिळाला?

४.वरंधा घाट कोठे आहे?

५. श्रमगार व कष्टकरी लोकांचे आई व वडील कोण आहेत.

६) लेखक ल. म. कडु यांच्या लहाणपणी आवडत्या दोन कलांची नावे लिहा .

७)आम्ही चालवू  पुढे हा वारसा या कवितेत शिष्याच्या मनावर कोणता ठसा असायला हवा असे कवी म्हणतात?

८)आपण सारे  एक या पाठात नाशिक सोडून जळगावला येणारे कोण व का आले?

प्रश्न ५. अ) खालील कोणत्याही  एका प्रश्नांचे उत्तरे तीन व चार वाक्यात लिहा. ( ३)

१.वरंधा घाटातील निसर्गाचे विहंगम दृश्याचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

२.  लेखक नंदू नाटेकर यांनी सांगितलेले व्यायामाचे व खेळाचे महत्त्व तुमच्या शब्दात लिहा.

प्रश्न ५. ब) खालील  कवितेच्या ओळीचा अर्थ  संदर्भासह स्पष्ट करा . ( ३)

१)माणुसकीशी अभंग नाते ,आम्हीच आमचे भाग्यविधाते

प्रश्न ५ ब.)पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची एका शब्दात उत्तरे  लिहा. ( ४ )

१.वास घेण्याचे जास्तीचे काम करणारी –----

२.माणसाच्या सौंदर्यात भर घालणारा अवयव -------

३.जिव्हाताई यांना संपात सामील करुण घेणार आहे--------

४.सर्वांनी ज्याच्याकडे तक्रार

केली तो अवयव------------

प्रश्न ५ .क ) प्रभात या कवितेच्या आधार रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. ( ४)

१ )सुंदर जग - कोणाचे  —----

२) पसरणारा सुवास - कोणाचा–------

३) अमूल्य शिकवण - कोणाची –-----

४)पायाभरणी - कशाची  —----